RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

**वर्ष १२, अंक ८]** **बुधवार, फेब्रुवारी ११, २०२६/माघ २२, शके १९४७** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये १६.००**

**असाधारण क्रमांक १३**

## प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील**
**(भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त)**
**अधिसूचना, आदेश व निवाडे.**

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ फेब्रुवारी २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.**

क्रमांक युडब्ल्युए-२०२५/प्र.क्र.२०९/काम-५.—खालील अधिसूचनेचा मसुदा, जो महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम, १९६९ (महाराष्ट्र अधिनियम XXX of १९६९) (यापुढे “सदर अधिनियम” म्हणून ओळखले जाईल) च्या कलम २६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून जारी करण्यात येत आहे. सदर अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये लोखंड आणि पोलाद बाजार किंवा दुकानांतील रोजगार संबंधित नोंद क्रमांक १, बाजार, कारखाने आणि इतर आस्थापना येथील रोजगार संबंधित नोंद क्रमांक ५ मध्ये सुधारणा करण्याबाबत आणि “ऊस लागवड क्षेत्रातील ऊस कापणी, मोळी बांधून बैलगाडीत/ट्रॅक्टर/ट्रकमध्ये भरणे, तोडलेला ऊस वाहून नेणे, त्याची भराई, उतराई किंवा अशा कामाच्या पूर्व तयारीचे किंवा तदनुषंगिक काम या संबंधातील नोकरी”, यांचा समावेश असलेली नोंद क्र. १५ या ऐवजी “माल भरणे,तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामाच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगीक कामे करून, अशा प्रकारच्या इतर कामासंबंधातील धातू (लोखंड व पोलाद वगळून) व कागद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी” याचा समावेश करण्याची बाब विचाराधीन आहे. त्यानुसार सदर अधिनियमाच्या कलम २६ नुसार आवश्यक असल्याप्रमाणे ही अधिसूचना सर्व संबंधित व्यक्तींच्या माहितीसाठी प्रकाशित केली जात आहे; आणि यासह सूचित करण्यात येते की ही अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीची मुदत संपल्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून विचारार्थ घेतली जाईल.

२. या मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तींकडून सह आयुक्त (माथाडी) कामगार, कामगार भवन, कामगार आयुक्त कार्यालय, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांच्याकडे प्राप्त होणारे कोणतेही आक्षेप आणि सूचना, वरील कालावधी संपण्यापूर्वी, शासनाकडून विचारात घेतले जातील.

## मसुदा अधिसूचना

क्रमांक युडब्ल्युए-२०२५/प्र.क्र.२०९/काम-५.—महाराष्ट्र माथाडी,हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम २६ अन्वये प्रदान केलेल्या प्राधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन सदर अधिनियमाला संलग्न अनुसूचीमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

अधिनियमाला संलग्न असलेल्या अनुसूचीमधील,—

(१) नोंद क्र. १ मधील "लोखंड व पोलाद किंवा दुकान यातील नोकरी" या शब्दांनंतर कंसामध्ये "(इमारत व इतर बांधकाम कामे वगळून)" या शब्दांचा समावेश करण्यात येईल.

(२) नोंद क्र. ५ मधील "इतर आस्थापनातील नोकरी" या शब्दांनंतर कंसामध्ये "(इमारत व इतर बांधकाम कामे वगळून)" या शब्दांचा समावेश करण्यात येईल.

(३) नोंद क्र. १५ मध्ये सुधारणा करून त्याऐवजी खालील नोंदीचा समावेश करण्यात येईल :—

" **१५.** माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे , त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामाच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगीक कामे करून, अशा प्रकारच्या इतर कामासंबधातील धातू (लोखंड व पोलाद वगळून) व कागद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी (इमारत व इतर बांधकाम कामे वगळून )".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिलीप वणिरे,**
शासनाचे अवर सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 11th February 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Mathadi, hamal and other manual Workers (Regulation of Employment & Welfare) Act, 1969.

No. UWA-2025/C.R.209/LAB-5.—The following draft of notification which is proposed to be issued by the Government of Maharashtra in exercise of the powers conferred by section 26 of the Maharashtra Mathadi Hamal and other Manual Workers (Regulation of Employment and Welfare) Act, 1969 (Mah. XXX of 1969) (hereinafter referred to as "the said Act"), with a view to modify item No. 1 relating to the Employment in Iron and Steel Market or shops, item No. 5 relating to Employment in markets, factories and other establishments and to substitute item No. 15 relating to "Employment in Sugarcane Cultivating Area in connection with doing the work of harvesting sugarcane, carting and stacking in bullock cart/tractor, truck, carrying, loading, unloading of sugarcane and such other work including the work preparatory or incidental to such operations", by item namely "Employment in Metal and paper market or shops in connection with loading, unloading, stacking, carrying, weighing, measuring or such other work including work preparatory or incidental to such operations", of the Schedule appended to the said Act, is hereby published as required by section 26 of the said Act for the information of all the persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after the expiry of the period of three months from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette*.

2. Any suggestions and objections which may be received by the Joint Commissioner (Mathadi) Labour, Kamgar Bhavan, Commissoner Office, Bandra-Kurla Comlex, Bandra (East), Mumbai 400 051, from any person in respect of the said draft, before the expiry of the above mentioned period will be taken into consideration by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No. UWA-2025/C.R.209/LAB-5.—In exercise of the powers conferred by section 26 of the Maharashtra Mathadi, hamal and other manual workers (Regulation of Employment & Welfare) Act, 1969 (Mah.XXX of 1969), the Government of Maharashtra hereby amends the schedule appended to the said Act, as follows, namely :—

In the Schedule appended to the said Act,—

(1) in item No. 1 after the words "to such operations" the brackets and words "(excluding building and other construction work)" shall be added;

(2) in item No. 5 after the words "entries in this Schedule" the brackets and words "(excluding building and other construction work and work related to shifting of house or office)" shall be added; and

(3) for item No. 15, the following entry shall be substituted, namely :—

"15. Employment in Metal (excluding iron and steel) and paper market or shops in connection with loading, unloading, stacking, carrying, weighing, measuring or such other work including work preparatory or incidental to such operations (excluding of building and other construction work)."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DILIP VANIRE,
Under Secretary (Labour) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.